आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२५ मार्च २०२५ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- वित्त विधेयक २०२५ लोकसभेत मंजूर /नवीन आयकर विधेयकावर पावसाळी अधिवेशनात चर्चा होण्याची शक्यता
- आपत्ती व्यवस्थापन सुधारणा विधेयक २०२४ ला संसदेची मंजुरी
- महाराष्ट्र विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावावरच्या चर्चेला मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांचं उत्तर, सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूप्रकरणी नेमलेल्या समितीनं अहवाल दिल्यावर त्यानुसार कारवाई करण्याचं आश्वासन
- छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराजांचा अवमान केल्याप्रकरणी अटक केलेल्या प्रशांत कोरटकर याला २८ तारखेपर्यंत पोलीस कोठडी

  **आणि**

- मियामी खुल्या टेनिस स्पर्धेत, पुरुष दुहेरीत भारताचा युकी भांब्री आणि पोर्तुगालचा नुनो बोर्जेस यांची जोडी उपांत्यपूर्व फेरीत दाखल

<><><><><>

लोकसभेत आज वित्त विधेयक २०२५ मंजूर झालं. २०२५-२६ वर्षासाठी केंद्र सरकारच्या आर्थिक प्रस्तावांची अंमलबजावणी करणं हा या विधेयकाचा उद्देश आहे. विधेयकावरच्या चर्चेला उत्तर देताना केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमन म्हणाल्या की, हे विधेयक करदात्यांना सन्मानित करण्यासाठी आणि व्यवसाय सुलभतेसाठी कर सवलत देणार आहे. नवीन आयकर

विधेयकावर पावसाळी अधिवेशनात चर्चा होण्याची शक्यता असल्याचं सीतारामन यांनी सांगितलं.

लोकसभेत आज बॉयलर विधेयक २०२४ ही मंजूर झालं. बॉयलरचे नियमन, स्टीम बॉयलरच्या स्फोटापासून जीवित आणि मालमत्तेची सुरक्षा सुनिश्चित करण्याची तरतूद या विधेयकात आहे. राज्यसभेनं याआधीच हे विधेयक मंजूर केलं आहे.

<><><><><>

आपत्ती व्यवस्थापन सुधारणा विधेयक २०२४ आज राज्यसभेत मंजूर झालं, लोकसभेत मागच्या वर्षीच डिसेंबरमध्ये हे विधेयक मंजूर झालं होतं. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तसंच राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची कार्यक्षमता अधिक वाढवण्याच्या हेतूनं सरकारनं हे सुधारणा विधेयक संसदेत मांडलं होतं.

नव्या सुधारणाअंतर्गत दोन्ही प्राधिकरणांना राष्ट्रीय कार्यकारी समिती आणि राज्य कार्यकारी समितीऐवजी राष्ट्रीय आणि राज्य स्तरावर आपत्ती व्यवस्थापन योजना तयार करण्याचे अधिकार दिले गेले आहेत. यासोबतच राज्य सरकारांना राज्याची राजधानी आणि महानगरपालिका असलेल्या शहरांसाठी स्वतंत्र शहरी आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण स्थापन करण्याचा अधिकारही दिला गेला आहे.

आपत्त्कालीन घटनांची व्याप्ती आणि प्रमाण बदललं असल्यानं त्यावरचा आपला प्रतिसाद बदलणं काळाची गरज असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी या विधेयकावरच्या चर्चेला उत्तर देताना सांगितलं.

काँग्रेसह विविध पक्षाच्या सदस्यांनी या विधेयकावरच्या चर्चेत सहभाग घेतला. या विधेयकात पीएम केअर्स फंडाचा तपशील किंवा त्याचा वापर कसा केला याचा उल्लेख नसल्याची टीका काँग्रेसचे नीरज डांगी यांनी या केली. हे विधेयक अधिक छाननीसाठी संयुक्त संसदीय समितीकडे पाठवावं अशी मागणी भारतीय कमुनिस्ट पक्षाचे संतोष कुमार पी यांनी केली.

<><><><><>

महाराष्ट्र विधानसभेत आज मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी अंतिम आठवडा प्रस्तावावरच्या चर्चेला उत्तर दिलं. छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराजांविरोधात अपशब्द वापरणाऱ्या कोरटकर याच्याविरोधात कठोर कारवाई करण्याचं आश्वासन त्यांनी दिलं. सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूनंतर झालेल्या शवविच्छेदन अहवालात विसंगती आहे, व्हीसेरा आणि बाह्य अहवाल वेगळा आहे, त्यामुळे या प्रकरणासाठी नेमलेल्या समितीनं अहवाल दिल्यावर त्यानुसार कारवाई करू, संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांनाही सोडलं जाणार नाही, असं ते म्हणाले. राज्यात हुक्का पार्लरचं वाढतं प्रस्थ रोखण्यासाठी यासंदर्भातल्या कायद्यात सुधारणा करण्याची घोषणा त्यांनी केली. हा गुन्हा दखलपात्र केला जाणार असल्याचं ते म्हणाले.

विधान परिषदेतही आज अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा सुरू झाली. राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती अतिशय गंभीर असल्याचा आरोप करत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी या चर्चेला सुरुवात केली. सरकारची कारवाईची मानसिकता नसल्यानं गुन्हेगारांना अभय मिळू लागलं आहे, असं ते म्हणाले. सत्ताधारी पक्षाच्या विरोधात बोललं की कारवाई केली जाते, मात्र महामानवांचा अपमान केल्यावर तत्परतेनं कारवाई होत नाही,

अनेक प्रकरणांत बुलडोझर लावून मालमत्तेचं नुकसान केलं जातं. यामुळे राज्याची प्रतिमा मलीन होते, हास्य कलाकार कुणाल कामरा यांनी काहीही चुकीचं वक्तव्य केलेलं नाही, त्यांच्या स्टुडिओची तोडफोड करणाऱ्यांकडून नुकसान भरपाई वसुल करायला पाहिजे, असं दानवे म्हणाले.

**<><><><><>**

राज्यघटनेचं अधिष्ठान लाभल्यामुळे संसदीय लोकशाही अधिक भक्कम झाली आहे, असं प्रतिपादन विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी आज केलं. भारताच्या राज्यघटनेची गौरवशाली अमृत महोत्सवी वाटचाल या विषयावर ते सभागृहात बोलत होते. राज्यघटनेच्या आधारे प्रगतीचा पल्ला आपल्याला गाठायचा आहे. स्वातंत्र्य, बंधुता, समता ही मूल्यं लोकशाहीत महत्त्वाची असून आपली लोकशाही जगासाठी प्रेरणादायी ठरतक आहे, असं त्यांनी नमूद केलं. उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनीही या चर्चेदरम्यान आपले विचार मांडले. त्या म्हणाल्या,

**होल्ड... बाईट- डॉ. नीलम गोऱ्हे..(३१ सेकंद)**

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या ३० तारखेला आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. या मालिकेचा हा १२०वा भाग असेल.

**<><><><><>**

छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांचा अवमान केल्याचा आरोप असलेल्या प्रशांत कोरटकरला कोल्हापूर पोलिसांनी तेलंगणातून अटक केली आहे. कोरटकर याने २४ फेब्रुवारी रोजी इतिहास

संशोधक इंद्रजीत सावंत यांना फोनद्वारे धमकी दिली होती. त्या दिवसापासून कोरटकर हा फरार होता. कोरटकरला आज कोल्हापूर जिल्हा सत्र न्यायालयात हजर करण्यात आलं. यावेळी पोलिसांनी सात दिवसांची कोठडी देण्याची विनंती केली. मात्र, न्यायालयानं कोरटकर याला २८ मार्चपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे.

<><><><>

मियामी खुल्या टेनिस स्पर्धेत, भारताच्या युकी भांब्री आणि पोर्तुगालच्या नुनो बोर्जेस यांच्या जोडीनं पुरुष दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. त्यांनी चेकियाच्या ॲडम पावलासेक आणि युनायटेड किंग्डमच्या जेमी मरे या जोडीचा ७-६, ६-२ असा पराभव केला. त्यांचा उपांत्यपूर्व फेरीचा सामना उद्या युनायटेड किंग्डमच्या लॉयड ग्लासपूल आणि ज्युलियन कॅश यांच्याशी होईल.

<><><><>

आयपीएल टीट्वेंटी क्रिकेट स्पर्धेच्या साखळी फेरीत आज अहमदाबाद इथं गुजरात टायटन्स आणि पंजाब किंग्ज यांच्यात सामना सुरु आहे. गुजरात टायटन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.
शेवटची बातमी हाती आली तेव्हा पंजाब किंग्जच्या ८ षटकात २ बाद ९४ धावा झाल्या होत्या.

<><><><>

केंद्र सरकारच्या एकात्मता साधणाऱ्या धोरणांमुळे जम्मू आणि काश्मीरममधून फुटीरतावादी चळवळींचा प्रभाव संपुष्टात आला असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी समाजमाध्यमांवरच्या आपल्या संदेशात

म्हटलं आहे. हुर्रियतशी संबंधित दोन संघटनांनी फुटीरतावादाशी असलेले आपले सर्व संबंध तोडण्याचा निर्णय जाहीर केल्याची माहिती त्यांनी या संदेशातून दिली आणि या निर्णयाचं स्वागतही केलं.

<><><><>

छत्तीसगडमधे दंतेवाडा आणि बिजापूर जिल्ह्यांच्या सीमावर्ती भागात आज सुरक्षा दलांसोबत झालेल्या चकमकीत तीन माओवादी ठार झाले. यांपैकी एक जण दंडकारण्य विशेष विभागीय समितीचा सदस्य म्हणून कार्यरत होता. सुरक्षा दलाला मिळालेल्या माहितीच्या आधारे ही कारवाई केल्याचं दंतेवाडाचे पोलीस अधीक्षक गौरव राय यांनी सांगितलं.

<><><><>

भारताला २०४७ पर्यंत आत्मनिर्भर देश बनवण्याच्या प्रक्रियेत अल्पसंख्याक समुदायाचं योगदान महत्त्वाचं असणार आहे असं, केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत झालेल्या राज्य अल्पसंख्याक आयोगांच्या परिषदेत बोलत होते.

<><><><>

बॉलिवूड अभिनेता अक्षय कुमारनं आज जागतिक दृक् श्राव्य आणि मनोरंजन परिषद 'वेव्ह्स  २०२५' साठी शुभेच्छा दिल्या. ही परिषद १ ते ४ मे दरम्यान मुंबईत होणार आहे.

<><><><>

अहिल्यानगर जिल्ह्याचे सुपूत्र हवालदार रामदास साहेबराव बढे आज जम्मू काश्मीरमधे तंगधर जिल्ह्यात कर्तव्य बजावत असताना शहीद झाले. त्यांच्या

पार्थीवावर संगमनेर तालुक्यातल्या मेंढवण या त्यांच्या मूळ गावी उद्या दुपारी लष्करी इतमामात अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

हवालदार रामदास बढे हे लष्कराच्या युनिट ३४ अंतर्गत फिल्ड रेजीमेंट मध्ये कार्यरत होते.

//<><><><><>//